महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १६ /०२/२०२३

परिपत्रक -

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.संकिर्ण १४२३/प्र.क्र.१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार), दिनांक ०१.०२.२०२३.

**विषय** :-"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" च्या औचित्यावर महाराष्ट्राचे "राज्यगित" स्विकृत करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.संकिर्ण १४२३/प्र.क्र.१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार), दि.०१.०२.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०३०२०११९००१०८४०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( विनय राणे )
वरिष्ठ कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / नियोजन व समन्वय / विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे /नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक,व्हीआयपी सुरक्षा, मुंबई /मोटार परिवहन विभाग, पुणे /नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

सर्व उच्चश्रेणी / निम्नश्रेणी लघुलेखक, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४



Scanned with CamScanner

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” च्या औचित्यावर
महाराष्ट्राचे “राज्यगीत” स्विकृत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१ फेब्रुवारी, २०२३

**प्रस्तावना :-**

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” चे औचित्य साधून राज्यातील तरुणाई तसेच समाजातील सर्वच नागरीकांना स्फुर्तीदायक असणारे तसेच महाराष्ट्राच्या शौर्याचे वर्णन करणारे अस्मितादर्शक असे राज्याचे अधिकृत राज्यगीत असावे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने, कवीवर्य श्री राजा नीळकंठ बढे लिखित "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे स्फुर्तीदायक गीत “राज्यगीत” म्हणून स्विकारण्यात यावे, या निष्कर्षाप्रत शासन आले आहे.

मूळ गीतामध्ये खालील प्रमाणे चार चरणे आहेत:-

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥धृ॥
रावी ते कावेरी भारत भाग्याच्या रेषा
निळे निळे आकाश झाकते या पावन देशा
तुंग हिमालय, विंध्य अरवली, सह्याद्री निलगिरी
उत्तर दक्षिण वारे पाऊस वर्षविती भूवरी
रेवा, वरदा, कृष्ण, कोयना, भद्रा, गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ॥ गर्जा.. ॥१॥

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा ॥ गर्जा.. ॥२॥

गलमुच्छे पिळदार मिशीवर उभे राहते लिंबू
चघळित पाने पिकली करितो दो ओठांचा चंबू
मर्द मराठा गडी ओढतो थंडीची गुडगुडी
ठसक्याची लावणीतही ठसकदार गुलछडी
रंगरंगेला रगेल मोठा करितो रणमौजा ॥ गर्जा.. ॥३॥

काळया छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी
निढळाच्या घामाने भिजला
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा
गर्जा महाराष्ट्र माझा गर्जा॥४॥

Scanned with CamScanner

या मुळ गीतामध्ये बदल करून शाहीर साबळे यांनी ३ चरणांचे खालीलप्रमाणे गीत गायले आहे:-

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥ धृ. ॥
रेवा, वरदा, कृष्ण, कोयना, भद्रा, गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा, जय जय महाराष्ट्र ॥१॥

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जवाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभु राजा
दरी दरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा ॥२॥

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देशगौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा ॥३॥

विचाराधीन संपूर्ण गीत हे अत्यंत आशयपूर्ण, स्फुर्तीदायक आणि राज्याच्या थोर आणि शूर परंपराची गाथा सांगणारे असले तरी राज्यगीत हे विविध प्रसंगी सातत्याने सादर होणे अपेक्षित आहे. त्यामुळे, वेळ मर्यादेचे भान ठेऊन त्याचे संक्षिप्तीकरण होणे आवश्यक ठरते. सध्या प्रचलित असलेल्या सदर गीतातील २ चरणे मिळून त्यांचे नव्याने ध्वनीमुद्रण करुन ते मर्यादित वेळेत म्हणजेच दीड ते पावणे दोन मिनिटात बसविण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय:**

१. कवीवर्य राजा बढे लिखित व शाहीर साबळे यांनी गायलेल्या गीतावर यथोचित संस्करण करुन दोन चरणांसह खालीलप्रमाणे राज्यगीत स्वीकृत करण्यात येत आहे. या गीताचा कालावधी सुमारे १.४१ मिनीटे आहे.

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥धृ॥
भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जवाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥१॥

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला



Scanned with CamScanner

देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा॥२॥

२. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सदर गीत दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ पासून महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून अंगिकारण्यात येत आहे. राज्य गीत सुमारे १.४१ मिनिटात वाजविता / गाता येईल.

३. "राज्यगीत" गायन/वादन यासंदर्भातील औचित्याचे पालन करण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन करण्यात यावे:-

१. विचारार्थ राज्यगीत अंगिकारण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरीही, राष्ट्रगीताचा मान, सन्मान व प्रतिष्ठा सर्वोच्च राहील.
२. शासनाच्या सर्व सार्वजनिक कार्यक्रमात सुरुवातीस राज्यगीताचे गायन/वादन हे ध्वनीमुद्रीत आवृत्तीसोबत अथवा स्वतंत्रपणे करण्यात यावे.
३. १ मे महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत होताच राज्यगीत वाजविले / गायिले जाईल.
४. राज्यातील शाळांमध्ये दैनिक सत्र सुरु होण्यापूर्वी, राष्ट्रगीत / परिपाठ/ प्रार्थना / प्रतिज्ञा यासोबत राज्यगीत वाजविले/गायले जाईल.
५. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, सर्व प्रकारच्या अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी आस्थापना तसेच सर्व नागरीकांना सांस्कृतिक, सामाजिक आणि क्रीडाविषयक कार्यक्रम इत्यादी मध्ये राज्यगीताचा योग्य तो सन्मान राखून ते वाजविण्यास/गाण्यास मुभा राहील.
६. राज्यगीत सुरु असतांना सर्वांनी सावधान स्थितीत उभे राहावे व राज्य गीताचा सन्मान करावा. लहान बालके, गरोदर स्त्रिया, आजारी व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती तसेच वृध्द व्यक्ती यांना सावधान उभे राहण्यापासून सूट असेल.
७. राष्ट्रगीताबाबतीत जसे तारतम्य बाळगण्यात येते तसेच ते राज्यगीताच्या बाबतीत सुध्दा बाळगण्यात यावे. हे गीत वाजवितांना/गातांना त्याचा योग्य तो सन्मान राखण्यात यावा.
८. वाद्यसंगीतावर आधारीत या गीताची वाद्यधून पोलीस बँडमार्फत वाजविता येईल.
९. राज्य शालेय शिक्षण मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये या राज्यगीताचा समावेश पुढील शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावा.
१०. या राज्यगीताच्या प्रभावी प्रचार व प्रसिध्दीसाठी सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त आस्थापनांस / कार्यालयांस सूचना द्याव्यात.
११. माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून राज्यगीताचा प्रचार/प्रसार करण्यासाठी विशेष मोहिम आखण्यात यावी. त्यासाठी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे तसेच समाज माध्यमांचाही सुयोग्य वापर करण्यात यावा.
१२. या राज्यगीताची लिंक राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.



Scanned with CamScanner

४. सर्व शासकीय कार्यालये/ निम शासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित व विना अनुदानित आस्थापना, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत उपक्रम, स्वयंसेवी संस्था व खाजगी आस्थापना तसेच सर्व नागरीकांना राज्यगीताच्या सन्मानपूर्वक गायन/वादनामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन या शासन निर्णयाद्वारे करण्यात येत आहे.

५. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सदर गीत दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ पासून "महाराष्ट्राचे राज्यगीत" म्हणून अंगिकारण्यात येत आहे. राज्य गीत सुमारे १.४१ मिनिटात वाजविता / गाता येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३०२०११९००१०८४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MANISHA PATANKAR MHAISKAR

Digitally signed by MANISHA PATANKAR MHAISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=fef2886076676dbebee07d0f1af7414b764ea7e53ecaa48a423e4054ca267ca6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=52783A272FC45F858A9EFA9D9E02BE6EF3188F66348E265A2D1F209EE93B9F6C, cn=MANISHA PATANKAR MHAISKAR
Date: 2023.02.01 19:05:22 +05'30'

**( मनीषा पाटणकर- म्हैसकर )**
प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी
महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव
३. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा//विधान परिषद यांचे खाजगी सचिव
७. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
१०. प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, मुंबई
११. सचिव, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
१२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व पोलीस आयुक्त
१६. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०. सर्व आयुक्त, महानगर पालिका



Scanned with CamScanner

२१. सर्व मुख्याधिकारी, नगर पालिका/ नगर पंचायत
२२. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
२३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
२४. निवड नस्ती.



Scanned with CamScanner